Estd : 1962
NAAC "A" Grade
MHRD-NIRF-28th Rank

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA**
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र**
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९००० संलग्नता टी-२ विभाग दूरध्वनी -०२३१ - २६०९०९१
संचालक , बी.सी.यु.डी. कार्यालय, दूरध्वनी : (थेट) ०२३१ - २६०९०७०

संदर्भ क्र.संलग्नता/टी-२/एसव्हीएम/विद्यापरिषद विषय क्र.१८५दि.१०/०४/२०१७/ No 1563 दि. 31 MAY 2017

प्रति,
मा. संचालक,
यशोदा टेक्लीकल कॅम्पस
फॅकल्टी ऑफ इंजिनिअरींग,
वाढे फाटा सातारा

मा. प्राचार्य,
यशोदा कॉलेज ऑफ आर्किटेक्चर,
वाढे फाटा, सातारा

विषय : आपल्या महाविद्यालयाच्या खालील अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरण प्रकाराबाबत विद्यापीठाची मान्यता.

संदर्भ : आपले जा. क्र. YSPM/YTC/ADMIN/२८९/२०१६-१७, Dtd.२३.०८.२०१६ चे प्रस्ताव.

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाकडून जून, २०१७ पासून खालील संलग्नीकरण प्रकाराचे व अभ्यासक्रमाचे प्रस्ताव मान्यतेकरीता प्राप्त झाले होते. सदर प्रस्तावास विद्यापीठ अधिकार मंडळाने स्थानिक चौकशी समितीने व छाननी समितीने घातलेल्या खालील अटी पुर्ततेच्या अधीन राहून पुढीलप्रमाणे मान्यता दिली आहे.

| अ.क्र. | संलग्नीकरणाचा प्रकार | अभ्यासक्रम | शाखा/विषय | विद्यापीठाची मान्यता |
|---|---|---|---|---|
| १. | नुतनीकरण | M.B.A. Part I & II | संपुर्ण अभ्यासक्रम(60) | शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून दोन वर्षासाठी |
| | | M.C.A. Part I, II & III | संपुर्ण अभ्यासक्रम(60) | |
| | | B. Arch Part – I & II | संपुर्ण अभ्यासक्रम(40) | शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून एका वर्षासाठी |
| २. | नैसर्गिक विस्तार | B. Arch Part - III | संपुर्ण अभ्यासक्रम(40) | |

**स्थानिक चौकशी समितीने व छाननी समितीने नमूद केलेल्या अटी खालीलप्रमाणे आहेत.**

१. शिखर संस्थांच्या मानकानुसार प्रत्येक अभ्यासक्रमांतील रिक्त जागी शिवाजी विद्यापीठ निवड समितीमार्फत शिक्षकांच्या नियमित नियुक्त्या त्वरीत करणेत याव्यात.
२. सेवापुस्ताकामधील नोंदी शासकिय नियमांप्रमाणे अद्ययावत कराव्यात.
३. प्रत्येक विभागातील डेडस्टॉक रजिस्टर अद्ययावत करावेत.
४. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वार्षिक वेतनावाढी नियमित देण्यात याव्यात.
५. एम.बी.ए. व एम.सी.ए. विभागामध्ये स्थानिक उद्योगांसाठी सामंजस्य करार(M.O.U) करणेत याव्यात.
६. इंजिनिअरींग साठी Indusry- Institute Interaction वाढविण्यात यावे.

B. Arch-

१. प्राचार्यांची विद्यापीठ समितीमार्फत निवड निवड करणेत यावी.
२. ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक, ३ सहयोगी प्राध्यापक, १ प्रोफेसर व सहाय्यक प्राध्यापकांची विद्यापीठ निवड समितीमार्फत निवड करणेत यावी.
३. आग प्रतिबंधक यंत्रणेची उपकरणे संख्या वाढविण्यात यावी.
४. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पी.पी. एफ. व ग्रॅच्युटी स्कीम लागु करावी.
५. वैधानिक समित्यांचे कामकाज नियमानुसार करावे.
६. नैसर्गिक विस्तारासाठी आवश्यक अर्थिक तरतुद करणेत यावी.

YSPM'S Yashoda Technic Campus, Satara
Inward No. 2 02/06/17
Issue to Registrar
Verified

......२

टिप :१. स्थानिक चौकशी समितीने संलग्नीकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार बाबत पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयास भेट दिलेल्या स्थानिक चौकशी समितीने विद्यापीठास सादर केलेला अभ्यासक्रमानुसार महाविद्यालयास प्राप्त गुणांकन तसेच छाननी समितीने दिलेला अभिप्राय तसेच आपल्या महाविद्यालयास नियमित प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक (आवश्यकतेनुसार) तसेच, संबंधित अभ्यासक्रमास आवश्यक असणाऱ्या शिक्षक पदे यांच्या विद्यापीठ निवड समितीमार्फत नियुक्त्या आणि इतर उपलब्ध आवश्यक भौतिक सुविधा इ. अवलोकनी घेवून विद्यापीठ अधिकार मंडळाने उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे आपल्या प्रस्तावास संलग्नीकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार यास मान्यता दिली आहे.

२. आपल्या महाविद्यालयास/संस्थेस आवश्यक असणारे नॅक/एनबीए मुल्यांकन/पुनर्मुल्यांकन केले नसल्यास ते त्वरित करून घेणे बंधनकारक राहील. याबाबतची पूर्तता झाली नसल्यास पुढील नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाची मान्यता ही स्थानिक चौकशी समितीने व छाननी समितीने घातलेल्या अटी पूर्ततेच्या अधीन राहून केली असल्याने आपल्या महाविद्यालयाने सदरच्या सर्व अटींची पूर्तता करुन संबधित कागदपत्रांच्या सत्यप्रतीसह **अटीपूर्तता अहवाल या पत्राच्या दिनांकापासून दोन महिन्यात विद्यापीठास सादर करावा.** त्या अटींची पूर्तता केल्यानंतर व त्यास विद्यापरिषदेने मान्यता दिल्यानंतरच सदरच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाची मान्यता कायम केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**तसेच उपरोक्त मान्यतेचा कालावधी लक्षात घेऊन पुढील संलग्नता मान्यतेचा प्रस्ताव विहीत शुल्कासह विद्यापीठास मुदतीत सादर करण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.**

कळावे,

आपला विश्वासू,

I/C उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

प्रत :- १. पात्रता विभाग, २. संबधित परीक्षा विभाग, ३. परीक्षक नियुक्ती विभाग,
४. अभ्यास मंडळे विभाग ५. संलग्नता (शिक्षक मान्यता) विभाग.